# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष-२ ■ अंक-२३ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ९ जानेवारी २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# कल्याण-तळोजा मेट्रोचे काम फास्ट ट्रॅकवर

## खासदार श्रीकांत शिंदे यांचा पाठपुरावा

## सखोल आरेखन सल्लागाराच्या नेमणुकीसाठी एमएमआरडीएकडून ११.२८ कोटींची निविदा जाहीर



**दिवा:- ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रोचे विस्तारित रूप म्हणून पाहिल्या जाणाऱ्या कल्याण-तळोजा मेट्रो मार्गाच्या उभारणीसाठी आता वेगाने हालचाली सुरू आहेत. या मेट्रो मार्गाच्या कामातील महत्वाचे टप्पे असलेल्या स्थानक, डेपो उभारणीच्या कामासाठी सखोल आरेखन सल्लागाराच्या नेमणुकीसाठी आता एमएमआरडीएने निविदा जाहीर केल्या आहेत. या मेट्रो १२ मार्गिकेला कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांमुळे गती मिळाली आहे. या मार्गामुळे मुंबई, पश्चिम आणि मध्य उपनगरे थेट कल्याण, भिवंडी, डोंबिवली आणि नवी मुंबईशी जोडली जाणार आहेत. यासाठी एमएमआरडीएकडून ११ कोटी २८ लाख रुपयांची निविदा नुकतीच जाहीर करण्यात आली. तर प्रत्यक्ष कामाची निविदा येत्या सात दिवसात जाहीर केली जाणार आहे.**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून मुंबईसह ठाणे आणि ठाण्याच्या पल्याड कल्याण- डोंबिवली शहरांसाठीही मेट्रो मार्गाची उभारणी केले जात आहे. ठाणे - भिवंडी - कल्याण या मेट्रो मार्गाची उभारणी वेगाने सुरू आहे. हा मार्ग पुढे कल्याणपासून डोंबिवली, कल्याण तालुक्यातील काही गावे आणि पुढे तळोजापर्यंत जाणार आहे. हा मेट्रो मार्ग २० किलोमीटरचा असून यात १७ स्थानके आहेत. या मार्गाच्या उभारणीमुळे कल्याण- डोंबिवली महापालिका क्षेत्र, कल्याण तालुक्यातील ग्रामीण भाग थेट नवी मुंबई, तळोजा या भागांशी जोडला जाणार आहे. या मार्गाच्या उभारणीसाठी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे सुरुवातीपासूनच आग्रही आहेत. काही महिन्यांपूर्वी खासदार डॉ. शिंदे यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एस. व्ही. आर. श्रीनिवास यांना पत्र लिहून या मार्गिकेच्या कामाला गती देण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर एमएमआरडीए मुख्यालयात झालेल्या बैठकीत या मार्गाचे सर्वेक्षण लवकरच सुरू करण्यात येईल असे आश्वासन महानगर आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार या मार्गाचे जलद गतीने सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले.

सद्यस्थितीला कल्याण- तळोजा मेट्रो १२ या मार्गिकेवरील १७ स्थानके, मेट्रो डेपो आणि इतर बांधकामासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून यासाठी एमएमआरडीएकडून ११ कोटी २८ लाख रुपयांची निविदा नुकतीच जाहीर केली आहे. तर सात दिवसांनंतर मेट्रो १२ च्या प्रत्यक्ष कामाची निविदा जाहीर केली जाणार असून ती साधारणतः सहा हजार कोटींची असेल, अशी माहिती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली आहे. खासदार डॉ. शिंदे यांच्या सततच्या प्रयत्नांमुळे मेट्रो १२ मार्गिकेला गती मिळाली आहे. या मेट्रो मार्गिकेचे काम लवकरच पूर्ण होणार असून कल्याण-डोंबिवली, ठाणे, नवी मुंबई आणि पनवेलमधील नागरिकांना दिलासा मिळणार आहे

# लाईट बिलातील वीज वहन आकार नियमबाह्य - आमदार संजय केळकर

**ठाणे:** वीज बिलातील वहन आकार नियमबाह्य असून या संदर्भात आपण अधिवेशनात आवाज उठवून नागरिकांना न्याय द्यायचं काम करणार असल्याचे ठाणे शहर आमदार संजय केळकर यांनी टोरंट ऑफिस कळवा येथे गुरुवारी झालेल्या मीटिंगमध्ये सांगितले.

वीज देयकासह प्रत्येक ग्राहकाकडून वहन आकार वसूल केला जातो हा आकार नियमबाह्य असल्याचा दावा मंदार भट यांनी सांगितले. वीज वितरण कंपन्या सर्व प्रकारच्या ग्राहकाकडून वीज वहनआकार वसूल करतात. राज्य सरकारी महावितरण कंपनी नोव्हेंबर २०१६ पासून ही वसुली करीत आहे ही वसुली नियमबाह्य असल्याने ती एक प्रकारे लूट आहे या लुटीचा आकडा जवळपास ७० ते ८० हजार कोटी रुपये असल्याचा दावा मंदार भट यांनी केला आहे. आणि या संदर्भात ते न्यायालयीन लढा लढत आहेत. वहन आकार नियमबाह्य आहे वीज कायदा व त्यामधील सुधारणा नुसार हा वहन आकार केवल ओपन एक्सेस अर्थात १ मेगा व्हॉटहुन अधिक थेट वीज खरेदी करणाऱ्या कडूनच वसूल करता येतो. पण राज्यातील सर्व वीज वितरण कंपन्या हा आकार सर्वच ग्राहकाकडून वसूल करीत आहेत मुख्य म्हणजे ही वसुली फक्त महाराष्ट्रातच सुरू आहे महाराष्ट्रात शिंदे फडवणीस सरकार आहे आणि हे सरकार लोकहिताचे निर्णय घेणारा सरकार आहे त्यामुळे लोकांच्या हिताचा निर्णय हे सरकार घेईल आणि या संदर्भात आपण ऊर्जामंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांची शिष्टमंडल घेऊन भेट घेऊन त्यांना या संदर्भातली माहिती देऊ असे केळकर यांनी म्हटले आहे यावेळी त्यांच्याबरोबर मंदार भट, ठाणे शहर सरचिटणीस मनोहर सुखदरे, दिवा मंडल अध्यक्ष रोहिदास मुंडे, आदी मान्यवर तसेच बहुसंख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com



# पत्रकार रवींद्र खर्डीकर यांच्या कुटुंबीयांना दिला राजकीय पुढारी अन् पत्रकारांनी आधार

**ठाणे:** दिवंगत पत्रकार रवींद्र खर्डीकर यांच्या शोक सभेला आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड, आमदार निरंजन डावखरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती दाखवून त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाने खर्डीकर यांच्या १० वर्षीय मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. २७ डिसेंबर रोजी त्यांचा कर्करोगामुळे मृत्यू झाला होता. रविवारी ठाण्यात त्यांची शोकसभा झाली.



पत्रकार रवींद्र खर्डीकर हे गेल्या काही महिन्यांपासून त्यांना फुफ्फुसाच्या कर्करोग झाला होता. त्यांच्यावर ठाण्यात बेथनी रुणालयात उपचार सुरू होते. मात्र उपचार सुरू असतानाच २७ डिसेंबर २०२२ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा असा परिवार आहे. सोमवारी अशार संजीव गृहनिर्माण सोसायटी येथे त्यांच्या राहत्या घरी रविवार ८ जानेवारी २०२३ रोजी उत्तर कार्य आणि शोक सभा पार पडली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार, माजी मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, भाजपचे आमदार निरंजन डावखरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ठाणे शहर अध्यक्ष आनंद परांजपे, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव मनोज शिंदे, डॉ. राजेश मढवी, माजी महापौर मीनाक्षी शिंदे, बाळासाहेबांची शिवसेनेचे प्रवक्ते राहुल लोंढे, युवक काँग्रेसचे बिंद्रा, ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे, जेष्ठ पत्रकार कैलास म्हापदी, जेष्ठ पत्रकार दीपक दळवी, दिलीप शिंदे, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे विकास काटे, अमोल सुर्वे, गणेश पारकर, संजय भालेराव यांसह संघाचे सर्व पत्रकार उपस्थित होते. डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी रवींद्र खर्डीकर यांच्या पत्नीस एक लाख रुपये, डॉ. राजेश मढवी यांनी एक लाख रुपये, ठाणे शहर पत्रकार संघाने दोन लाख आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक लाख रुपयांची मदत दिली. तर पत्रकार संघाने खर्डीकर यांच्या १० वर्षीय मुलाचा शिक्षणाचा खर्च उचलण्याचे जाहीर केले. काही नगरसेवक आणि राजकीय पुढाऱ्यांनीही खर्डीकर कुटुंबीयांना आर्थिक मदत केली. यावेळी पत्रकार संघ त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहील असे पत्रकार कैलास म्हापदी, संजय पितळे यांनी जाहीर केले.

## ठाण्यात पत्रकार दिन साजरा

# पत्रकारांना हेल्थ कार्डचे वाटप

ठाणे: आद्य मराठी पत्रकार आणि थोर समाजसुधारक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या पहिल्या मराठी दर्पण या वृत्तपत्राची सुरुवात ६ जानेवारी रोजी केल्यामुळे हा दिवस हा पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो.

या पत्रकार दिनानिमित्त ठाणे महापालिका पत्रकार कक्षात ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.तदनंतर दुपारी नरेंद्र बल्लाळ सभागृहात वेदांत रुग्णालयाच्यावतीने पत्रकारांना मोफत उपचारासाठी हेल्थ कार्डचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी,ठाणे मनपाचे उपायुक्त मनिष जोशी,जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे,ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष राजेश मोरे, कार्याध्यक्ष विकास काटे आणि वेदांत रुग्णालयाचे संचालक अजय सिंग यांच्या हस्ते आरोग्य कार्डचे वितरण करण्यात आले. यावेळी उपयुक्त जोशी यांनी ठाणे पालिकेने पत्रकार कल्याण निधीसाठी केलेली एक कोटींची तरतूद कशाप्रकारे कार्यान्वित करता येईल, याचे आश्वासन दिले. सूत्रसंचालन दिलीप शिंदे यांनी केले.यावेळी अनेक पत्रकार उपस्थित होते.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# एसटी बसला आग; ६५ प्रवासी सुखरूप



**ठाणे:** ठाण्यातून सुमारे ६५ प्रवासी घेऊन भिवंडीला निघालेली महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसला आग लागल्याची घटना ठाण्यातील उथळसर रोड येथे मंगळवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास लागली. वेळीच ही बाब लक्षात आल्याने मोठे अनर्थ टळले. बसमधून प्रवास करणारे सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले असून बसच्या स्टार्टरमध्ये शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

भिवंडी डेपोची बस मंगळवारी सकाळी सव्वा आठच्या सुमारास प्रवासी घेऊन ठाण्याकडून बस चालक आनंद विठोबा सवारे आणि वाहक अजित कांबळे भिवंडीला निघाले होते. बस उथळसर जवळ येताच बसच्या स्टार्टरमध्ये शॉर्टसर्किट होऊन आग लागली. याची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. दरम्यान सावधगिरी बाळगून बस चालक आणि वाहक तसेच स्थानिक नागरिकांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तर दुसरीकडे बसमधील प्रवाशांना सुखरूप बसमधून बाहेर काढण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात यश आले. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली. या घटनेमुळे काही मिनिटे त्या परिसरात वाहतूक कोंडी झाली होती.



# धावत्या टेम्पोला आग



**ठाणे: येथील नाशिक-मुंबई वाहिनीवरून जाणाऱ्या टेम्पोला रविवारी रात्री साडेदहाच्या आग लागल्याची घटना खारेगाव टोल नाक्याजवळ घडली. या घटनेत जरी कोणालाही दुखापत झाली नसली तरी टेम्पोचे नुकसान झाले आहे. आग लागलेला टेम्पो लालबहादूर यादव यांच्या मालकीचा असून त्या टेम्पोला आग लागल्याची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत, त्या आगीला अवघ्या काही मिनिटांमध्ये नियंत्रणात आणण्यात यश आले. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# वळण रस्त्यावर लावण्यात आलेले बॅरिकेट्स हटवण्यासाठी आमदार उतरले रस्त्यावर




## अखेर तो रस्ता पुन्हा केला खुला

**ठाणे :** गेल्या काही दिवसांपूर्वी पोखरण रोड नं. १ समतानगर येथील चौकासमोरील वळण रस्ता वाहतुक विभागाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून बॅरिकेट्स लावून बंद करण्यात आला होता. शनिवारी स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांच्यासह स्थानिक रहिवाशांनी आंदोलन केले. तसेच त्या वळण रस्त्यावर लावण्यात आलेले बॅरिकेट्स हटवून तो रस्ता पुन्हा खुला करण्यात आला.

मुख्य रस्त्यावर वाहतुकीस अडथळा होत असल्यामुळे पोलिस वाहतुक विभागाच्या अधिकाऱ्यांनी समतानगर चौकासमोरील वळण रस्ता बॅरिकेट्स लावून बंद केला. जर रहदारीचा प्रश्न उद्भवत असेल तर वाहतुक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रेमंड कंपनी समोरील जाणारा रस्ता सोडला, सिंघानिया शाळेला जाणारा सोडला पण समतानगर चौकासमोरील वळण रस्त्यावरून लाखों लोकांची वर्दळ होत असून समतानगर मधील स्थानिक नागरिकांचा त्यासाठी विरोध असताना देखील हा वळण रस्ता का बंद करण्यात आला? असा सवाल सरनाईक यांनी यावेळी उपस्थित केला.

समतानगरमधील १९ मीटर रस्ता पुढे लुईसवाडीला जावून मिळतो त्यामुळे तेथे वाहतुक वर्दळ जास्त असते. बाजूला असलेल्या रेमंड कंपनी व सिंघानिया शाळेला झुकते माप देण्यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी व वाहतुक पोलिस यांच्या संगनमताने स्थानिक नागरिक व माजी नगरसेवक यांना विश्वासात न घेता असा तुघलघी निर्णय घेण्यात आल्याचा आरोप करीत स्थानिक नागरिकांकरिता मला रस्तावर उतरून आंदोलन करावे लागले तरी त्याकरिता माझी तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सद्या महापालिकांवर प्रशासकीय राजवट असून महानगरपालिकेच्या लोकप्रतिनिधींच्या अभावामुळे महापालिकेच्या अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार चालू असल्याचे



चित्र दिसत आहे. स्थानिक आमदार म्हणून काळे कपडे घालून प्रशासनाच्या या वृत्तीचा मी निषेध करीत असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान यावेळी महापालिकेचे अधिकारी विकास ढोले यांना बोलावून समातनगर चौकासमोरील डिव्हाडर मधील रस्ता तात्काळ पुर्ववत करून तेथे सिग्नल यंत्रणा बसविण्यासंदर्भात संबंधित विभागाला आमदार सरनाईक यांनी सुचना दिल्या.

# दिव्यात अजितदादांचा पुतळा पायाखाली तुडवला

## भाजपाचे आंदोलन

**ठाणे: धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या बाबत आपत्तीजनक वक्तव्य करणारे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या निषेधार्थ दिवा भाजपाने मंगळवारी दिवा स्टेशन येथे निषेध आंदोलन केले.यावेळी अजित पवार यांच्या पुतळ्यावर शाई टाकून चपलीचे जोडे मारले. तसेच त्या पुतळ्याला पायाखाली तुडवत निषेध करण्यात आला.**

ठाणे शहर जिल्हाध्यक्ष व आमदार निरंजन डावखरे व ठाणे शहर आमदार संजय केलकर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक व गटनेते मनोहर डुंबरे परिवहन सदस्य विकास पाटील व दिवा शहराध्यक्ष रोहिदास मुंडे व शीळ मंडळ अध्यक्ष बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी अजित पवार यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. याप्रसंगी ठाणे शहर कार्यकारणी सदस्य गणेश भगत ,अशोक पाटील ,विजय भोईर ,ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष विनोद भगत, संघटक सरचिटणीस दिलीप भोईर ,सरचिटणीस समीर चव्हाण ,युवराज यादव, दिवा युवा मोर्चा अध्यक्ष सचिन भोईर ,शीळ युवा मोर्चा अध्यक्ष साहिल पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष ज्योती पाटील, सीमा भगत,



उत्तर भारतीय सरचिटणीस अवधराज राजभर, अमरनाथ गुप्ता ,पंकज सिंग ,अंकुश मढवी, मधुकर पाटील ,प्रवीण पाटील, विजय वाघ, आशिष पाटील, निलेश भोईर ,प्रणव भोईर ,मृणाल भगत, गौरव पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

***पवार कुटुंबियांनी कधीही शिवाजी महाराजांचा सन्मान केलेला नाही. कधी भाषणात सुद्धा महाराजांचा उल्लेख केलेला नाही. पण, विधानभवनात अजितदादांनी संभाजी महाराजांबद्दल केलेल्या वक्तव्याचा भाजपाकडून तीव्र शब्दात निषेध केला जात आहे. त्यानुसार दिवा येथे निषेध आंदोलन करण्यात आले. संभाजी महाराजासंदर्भात अजितदादांनी इतिहास समजून घेत, मगच सभांजी महाराजांबद्दल बोलावे.***

**– मनोहर डुंबरे,**
*माजी नगरसेवक व गटनेते, भाजपा*

# दिव्यात क्लस्टरच्या सर्वेक्षणाला शुभारंभ

**ठाणे:** दिव्यातील सुमारे ५ लाख नागरीकांना आता क्लस्टरच्या माध्यमातून हक्काची घरे मिळणार आहेत. यासाठी मंगळवारपासून क्लस्टरच्या सर्वेक्षणाला शुभारंभ झाला. पण, या सर्व्हेला पहिल्याच दिवशी दिव्यातील काही भागात नकार घंटा वाजवून विरोध दर्शविल्याचे दिसून आले. हा सर्व्हे सुरू केल्याने अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे चांगले धाबे दणादणले आहेत. तर, दुसरीकडे महापालिकेच्या क्लस्टर सेलच्या वतीने क्लस्टरच्या सर्व्हेला सहकार्य करा असे आवाहन करण्यात आले आहे.

दिव्यात मागील काही वर्षात अनधिकृत चाळींसह इमारतींचे बांधकाम ही तितक्याच झपाट्याने होताना दिसून येत आहेत. मध्यंतरी रस्त्याच्या आड येणाऱ्या काही अनधिकृत इमारतींवर पालिकेने हातोडा टाकला होता. त्यात २०२२ मधील फेब्रुवारी महिन्यात झालेल्या महासभेत दिव्याच्या क्लस्टरच्या सर्व्हेसाठी मंजुरी मिळाली होती. त्याची मार्च महिन्यात निविदा काढली गेली. आता म्हणजे मंगळवारपासून पहिल्या टप्प्यातील सर्व्हेचा शुभारंभ ही झाला. त्यात आता क्लस्टरच्या माध्यमातून आता दिव्याचा विकास केला जाणार असल्याने या सर्व्हेला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. मात्र शुभारंभाच्या पहिल्या दिवशी या सर्व्हेला दिव्यातील काही भागात विरोध दर्शविल्याचे दिसून आले. अनधिकृत बांधकाम करून येथील भुमाफीया गब्बर झाले आहेत. परंतु आता क्लस्टरच्या माध्यमातून हक्काचे घर येथील रहिवाशांना मिळणार असल्याने अनधिकृत बांधकामे उभारण्याचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळेच पहिल्या दिवशी नकार घंटा वाजून विरोध दर्शविण्याचे काम त्यांच्याकडून सुरू झाल्याचे बोलले जात आहे.

# अनधिकृत बांधकामांवर परिणामकारक कारवाई अपेक्षित

## -आयुक्त अभिजीत बांगर



**ठाणे: शहरातील अनधिकृत बांधकामांबाबत फक्त तक्रारींच्या आधारावर किंवा अधूनमधून कार्यवाही न करता ती दररोज होणे अपेक्षित आहे, जेणेकरुन परिणामकारक पध्दतीने अनधिकृत बांधकामांवर अंकुश मिळवणे सोपे होईल. अनधिकृत बांधकामांच्या बाबतीत आपण केलेल्या किंवा न केलेल्या कार्यवाहीचा परिणाम फक्त अनधिकृत बांधकामे वाढण्यापुरता किंवा कमी होण्यापुरता मर्यादित न राहता त्याचा परिणाम भविष्यात होवू शकणारी दुर्देवी घटना ज्याच्या माध्यमातून जीवितहानीसुद्धा होवू शकते अशी घटना टाळण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे.**

ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामांची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून सध्या अनधिकृत बांधकामांबाबत अधिकाऱ्यांकडून दैनंदिन कार्यवाही होताना दिसत नाही. अंदाधुद पध्दतीने शहरात सध्या अनधिकृत बांधकामे फोफावताना दिसत आहेत अशा तिखट शब्दात सर्व सहाय्यक आयुक्तांची महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी झाडाझडती घेत शहरात एखादी दुर्घटना घडून जीवितहानी झाली तर व्यक्तीशः जबाबदारी निश्चित केली जाईल असा इशाराही त्यांनी यावेळी दिल्या.

> **अनधिकृत बांधकामांची समस्या ही सर्व शहरांमध्ये कमीअधिक फरकाने अस्तित्वात आहे. मात्र महापालिका प्रशासनाने आपल्या सर्व अधिकारांचा वापर करुन त्यावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरुन शहरामध्ये अनियोजित विकास होणार नाही. तसेच स्वस्त व मर्यादित आर्थिक लाभाच्या भूलथापांना बळी पडून नागरिक धोकादायक घरांमध्ये राहण्यासाठी प्रवृत्त होणार नाही. महानगरपालिकेने आपल्या कार्यवाहीच्या माध्यमातून अतिक्रमण विरोधी पथकाचे अस्तित्व जाणवेल अशा पध्दतीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.**
>
> **– अभिजीत बांगर,** महापालिका आयुक्त, ठाणे

ठाणे शहरात अनधिकृत बांधकामांवर सुरू असलेल्या कारवाईचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी बैठक आयोजित केली होती. शहरात अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याची प्रक्रिया विशेषतः कळवा, मुंब्रा, दिवा परिसरातील अनधिकृत बांधकामाचा प्रश्न गंभीर आहे. अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणावर कारवाई करण्याची प्रक्रिया ०२ मार्च २००९ च्या शासननिर्णयात विषद केली आहे. त्यामध्ये विविध स्तरावर अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करुन दिल्या असून उपआयुक्तांच्या नेतृत्वाखाली अनधिकृत बांधकाम/ अतिक्रमण नियंत्रण निमुर्लन पथक कार्यरत राहिल. प्रत्येक प्रभागात होणाऱ्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याची व्यक्तीशः जबाबदारी ही सहायक आयुक्त व प्रभाग अधिकारी यांची असेल. प्रभागाची बीटनिहाय विभागणी करुन प्रत्येक बीटमध्ये बीटनिरीक्षक व बीटमुकादम नेमण्यात यावे. बीटनिरिक्षकाने परवानगी नसेल अशी प्रकरणे संबंधित प्रभागअधिकाऱ्यांच्या किंवा सहाय्यक आयुक्तांच्या निर्दशनास आणावीत. प्रभाग अधिकाऱ्याने याबाबत तपासणी करुन जर ते समाधानकारक आढळले नाही तर नियमानुसार संबंधितांना नोटीस द्यावी, व संबंधित व्यक्ती नोटीस कालावधीत कागदपत्रे सादर न करु शकल्यास त्या गुन्ह्याबाबत आवश्यक ती कारवाई करण्यात यावी. प्रभागस्तरावर बीटनिहाय नोंदवही ठेवण्यात यावी. या नोंदवहीमध्ये त्यांच्या बीटमधील अनधिकृत बांधकाम/ अतिक्रमण इ नागरी गुन्ह्याशी संबंधित घटनेची नोंद ठेवावी तसेच न केल्यास संबंधित बीट निरीक्षकास जबाबदार धरण्यात यावे. तसेच बीटमध्ये अतिक्रमण अनधिकृत बांधकामाची एकही घटना निर्दशनास न आल्यास त्यांचीही नोंद बीट रजिस्टरमध्ये करण्याची जबाबदारी बीट निरीक्षक व बीट मुकादमाची राहील.

### केलेल्या कारवाईचा अहवाल दररोज आवश्यक

अनधिकृत बांधकाम निष्कासन कारवाईचा दैनंदिन अहवाल मुख्यालयाकडे उपायुक्तांकडे सादर करावी. उपायुक्तांनी शहरात करण्यात आलेल्या कारवाईचा दैनंदिन आढावा आयुक्तांकडे सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या. अनधिकृत बांधकामाबाबत विहित मुदतीत नोटीस न दिल्यास पुढील कारवाई न केल्यास संबंधितांना व्यक्तीशः जबाबदार धरले जाईल अशाही सूचना यावेळी आयुक्त बांगर यांनी दिल्या.

### प्रभागसमितीनिहाय समर्पित (dedicated) पथके

प्रत्येक प्रभागसमिती स्तरावर अतिक्रमण निष्कासनासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी. ज्यामध्ये स्वतंत्र मनुष्यबळ, पोलीस कर्मचारी व यंत्रसामुग्री संपूर्णतः सहाय्यक आयुक्तांच्या अधिकारात उपलब्ध राहणे आवश्यक आहे तशी व्यवस्था केली जावी तसेच जर अतिरिक्त कुमक आवश्यक असेल तर परिमंडळ उपायुक्तांनी यांनी थेट कंत्राटदाराकडून उपलब्ध् करुन घेणे आवश्यक आहे त्यासाठी मुख्यालयाकडे अतिरिक्त कुमक मागविण्याची गरज पडता कामा नये अशा सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या.

### अतिरिक्त पोलीस कर्मचारी घ्या

अनधिकृत बांधकामाच्या कारवाईकरिता ७८ पोलीस कर्मचाऱ्यांची मान्यता शासनाकडून आली आहे. त्यापैकी पोलीस विभागाकडून ४८ कर्मचारी देण्यात आले आहे, परंतु अतिरिक्त ३० पोलीस कर्मचारी घ्या असेही बांगर यांनी नमूद केले. ठाणे स्टेशनच्या बाहेर अतिक्रमणची कारवाई करताना पोलीसांच्या ड्यूट्या निश्चित केल्या जातील.

करण्यासाठी ५० रु प्रति चौ. फूटनुसार शुल्क आकारले जाते. सदरचे शुल्क सन २००७ च्या ठरावानुसार निश्चित करण्यात आले होते. सदरचा ठराव हा जुना असून सद्यस्थितीतील आढावा घेवून शुल्काची रक्कम वाढविण्यात यावी.

शुल्काची रक्कम प्रलंबित राहत असून त्याची वसुली होत नसल्याचे निर्दशनास येत असून हे शुल्क वसुल करताना ते मालमत्ता कराची थकीत वसुली आहे असे समजून वसूल करण्यात यावे. जेणेकरुन मालमत्ता कर थकीत रक्कम वसुलीसाठी कायद्याने जी प्रक्रिया दिली आहे, त्या सर्व प्रक्रियेचा अवलंब करणे शक्य होईल.

### सहाय्यक आयुक्तांनी जबाबदारीने कामे करा

सर्व प्रभाग समित्यांच्या सहाय्यक आयुक्तांना आपापल्या प्रभागातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींचा गोषवारा तयार करुन स्थळ पाहणी करावी. स्थळ पाहणीदरम्यान निर्दशनास येणाऱ्या अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये कालबद्ध पध्दतीने विहित कार्यपध्दतीत सात दिवसात कडक कारवाई करावी तसेच प्रभाग समिती कार्यक्षेत्रात नवीन अनधिकृत बांधकामे होवू न देण्याबाबतची खबरदारी किंवा सर्व नवीन बांधकामे मंजूर आराखड्यानुसारच होत आहेत किंवा कसे याची पाहणी प्रभागस्तरावरील पथकाने नियमित करावी.

# ... तर आव्हाडांनी औरंगजेबाचे मंदिरच उभारावे

## – नरेश म्हस्के

**ठाणे :** राष्ट्रवादीचे आमदार व माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्यावर बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी निशाणा साधत, त्यांच्याकडून औरंगजेबाचे उद्दातीकरण होणे आयोग्य आहे. त्यातही आव्हाडांना जर तसेच वाटत असेल तर त्यांनी औरंगजेबाचे एक मंदीरच बनवावे. तसेच त्या मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याला विरोधी पक्षनेते अजित पवार, खासदार संजय राऊत आणि माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना बोलवावे. असा टोला त्यांनी लगावला आहे.

अजित पवारांनी माफी मागावी यासाठी भाजपकडून आंदोलन उभे केले जात आहे. तर अजित पवारांनी माफी का मागावी असा सवाल उपस्थित करीत आव्हाडांनी पलटवार केला आहे. त्यानंतर माजी महापौर म्हस्के यांनी आव्हाडांना लक्ष्य करत टोला लगावला आहे. आव्हाड यांच्यासाठी वेगळा इतिहास कोणी लिहीला असेल तर माहित नाही, ते आपल्या सोयीने इतिहास मांडत असतात असेही ते म्हणाले. औरंगजेबाला हिंदू धर्माचा तिरस्कार होता, संभाजी राजांचे आतोनात हाल करत त्यांची हत्या औरंगजेबाने केली. संभाजी राजांनी मुस्लिम धर्म स्वीकारला नाही, त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली मग त्यांना धर्मवीर म्हणायचे नाही का? असा सवालही त्यांनी आव्हाड यांना केला.याचदरम्यान म्हस्के यांनी खासदार संजय राऊत यांचाही समाचार घेत, ते ज्या दिवसापासून जेल मधून सुटले त्या दिवसापासून त्यांनी वायफळ गप्पा मारण्याचे काम सुरू केले आहे. त्यांची मानसिक स्थिती बिघडली आहे, माझ्या प्रभागात मनोरुग्णालय असून कदाचित तेथे त्यांना काही दिवसात आणावे लागेल असा टोला त्यांनी लगावला.

नागपूर अधिवेशनला गेले आणि म्हणाले आम्ही अस करणार तस करणार परंतु एक म्हण आहे , खोदा पहाड निकला संजय राऊत अशी परिस्थिती असल्याची खिल्लीही त्यांनी उडवली. धर्मवीर म्हणायचं नाही अशा वक्तव्यावर निषेध पण व्यक्त करत नाही याचा अर्थ आम्ही अस म्हणायचं का संजय राऊत आणि ही मंडळी राष्ट्रवादी ची धुणीभांडी करतात असा सवालही त्यांनी उपस्थित केला. संजय राऊत यांनी हे पाहावे उरलेले जे काही आमदार खासदार आहेत जे नगरसेवक आहेत त्यातील आपल्याकडे किती राहणार आहेत, येत्या काही दिवसात कळेल किती आमदार किती खासदार हे एकनाथ शिंदे यांच्या मागे उभे राहतात हे ही दिसून येईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

# ओबीसी एकत्र आले तर देशाचा पंतप्रधान ठरवतील

## डॉ. जितेंद्र आव्हाड यांचा आशावाद

**ठाणे : ओबीसी हा जात समूह कधीच एकत्र येत नाही. सुमारे ५४ टक्के लोकसंख्या असलेला हा वर्ग जर एकत्र आला तर या देशाचा पंतप्रधान ठरवू शकतो; आरक्षणाचे विरोधक कोण, आणि समर्थक कोण याची जाणीव ठेवून ओबीसींनी राजकीय भूमिका घ्यायला हवी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी ठाण्यात केले.**




## लवकरच ठाण्यात फुले स्मारक साकारणार – निरंजन डावखरे

## भिडेवाडा स्मारकासाठी शिंदे सरकार अनुकूल- नरेश म्हस्के

ओबीसी एकीकरण समितीच्या वतीने सावित्री माई फुले यांच्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन ठाण्यातील टाऊन हॉल येथे करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. आव्हाड बोलत होते. यावेळी आमदार निरंजन डावखरे, माजी महापौर नरेश म्हस्के, माजी खासदार आनंद परांजपे, माजी नगरसेवक संदीप लेले, माजी नगरसेविका मृणाल पेंडसे, कविता पाटील, नंदा पाटील, नम्रता कोळी, कमल चौधरी, प्रतिभा मढवी, दिपा गावंड, ऋता आव्हाड, प्रा. प्रकाश भांगरथ, भालचंद्र ठाकरे, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पत्रकार रुपाली बिडवे, कॉमनवेल्थमध्ये सुवर्णपदक पटकावणारी वैशाली तांडेल, श्री व. सौ. घाडगे दाम्पत्य, विक्रीकर सहआयुक्त तनुजा मस्करे, वनाधिकारी गिरीजा देसाई, सरकारी वकील रेखा हिवराळे यांचा 'सावित्रीच्या लेकी' या पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

डॉ. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, सावित्रीमाई आणि जोतिराव फुले यांनी स्त्री शिक्षणाची दारे उघडली त्याचा सर्वाधिक फायदा विशिष्ठ जातीच्या महिलांनीच घेतला. पण, सावित्रीमाईंना याच वर्गाने विरोध केला होता, हे विसरता कामा नये. सत्यशोधक समाज फुलेंनी स्थापन केला. पण, या दाम्पत्याने जी बिजे रोवली त्याचे आज वटवृक्ष झाले आहेत. आता कोणीतरी म्हणाले की फुलेंनी भिक मागून शाळा सुरु केल्या. पण, त्यांना हे माहित नाही का, की टाटांपेक्षा फुलेंचे वार्षिक उत्पन्न अधिक होते. ते प्रचंड श्रीमंत होते. मागासवर्गीयांच्या आरक्षणाची भाषा सर्वात आधी कोणी केली असेल तर ती महात्मा फुलेंनी!

देशामध्ये आपली संख्या ५४ टक्के आहे. त्यामुळे राष्ट्रीय राजकारणात आपण एक झालो तर या देशाचा पंतप्रधान आपण ठरवू. पण, आपण एकत्र होतच नाही. आपणाला मनुवादाचा स्पर्श व्हायला लागला आहे. आपणही नको त्यांच्या मागे लागलो आहे.ज्यांनी सावित्रीमाई-जोतिबांना, बाबासाहेब, शाहू यांना सन्मान दिला नाही. ते आपल्याला काय सन्मान देणार? म्हणून आरक्षण गरजेचे आहे. आरक्षणामुळेच आपला समाज पुढे जाईल. खाईत पडलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी आधार आरक्षण आहे. पण, तेच आता काढून घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. जर आरक्षण टिकवू शकलो नाही; तर, पुढचा काळ कठीण आहे. या काळापासून वाचण्यासाठी आपणाला संविधान वाचविण्याची शपथ घ्यावी लागेल. संविधान आहे म्हणून आपण आहोत, हे ध्यानात ठेवा, असेही डॉ. आव्हाड यांनी सांगितले.

दरम्यान, यावेळी आ. निरंजन डावखरे यांनी, ठाणे शहरात फुले दाम्पत्याचे स्मारक उभे राहिले पाहिजे, यासाठी माझा आग्रह आहे. शासन-प्रशासनाच्या दरबारी त्यासाठी संघर्ष करण्याची आपली तयारी आहे. निधीची तरतूद तर केली आहेच; लवकरच हे स्मारक उभे राहिल, अशी ग्वाही दिली. तर, नरेश म्हस्के यांनी, ठाणे शहरात स्मारक उभे करण्यासाठी आम्ही अनुकूल असून हे स्मारक लवकरच उभे राहिल, असा आशावाद व्यक्त करुन भिडेवाडा स्मारकाचा प्रश्नही लवकरच निकाली निघेल, असे आश्वासन दिले.

### स्वाक्षरी मोहीम

**फुले दांपत्यांना भारतरत्न दिलाच पाहीजेल मागणी करत, स्वाक्षरी मोहीम ही यावेळी राबविण्यात आली. यामध्ये उपस्थित मान्यवरांसह कार्यक्रमास आलेल्या मंडळींनी स्वाक्षऱ्या केल्या आहे. यामध्ये माजी मंत्री आव्हाड यांच्यासह आदींचा समावेश आहे.**

# अंबरनाथ शहर होणार 'टेंपल सिटी'

## खासदार श्रीकांत शिंदे यांची संकल्पना

**ठाणे:** अंबरनाथ शहरातील शिलाहारकालीन प्राचीन शिवमंदिर परिसराचा विकास लवकरच केला जाणार आहे. या अनुषंगाने संपूर्ण अंबरनाथ शहर सुशोभित करण्याचा आणि शहराची ओळख राष्ट्रीय स्तरावर मंदिरांचे शहर अर्थात टेंपल सिटी म्हणून करण्याची संकल्पना कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मांडली होती. त्यानुसार शहरातील सर्व चौकांचे आणि मोठ्या रस्त्यांचे सुशोभिकरण करण्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन आणि सल्लागारांची नेमणूक करण्यासाठी आता अंबरनाथ नगरपालिकेने निविदा प्रसिध्द केली आहे. शहरातील शिलाहारकालीन वास्तू वैभवाला साजेसे असे चौक



आणि रस्त्यांचे सुशोभिकरण करण्यात येत आहे.

गटार आणि पायवाटांव्यतिरिक्ती शहराचा विकास कसा साधता येतो हे खासदार शिंदे यांनी गेल्या काही वर्षात राबवलेल्या प्रकल्पांमधून दाखवून दिले आहे. खासदार शिंदे यांच्या नेतृत्वाखाली अतिशय नाविन्यपूर्ण प्रकल्प राबवून साकार झालेला विकासाचा अंबरनाथ पॅटर्न सर्वत्र कौतुकाचा विषय ठरला आहे. अंबरनाथ शहराच्या पूर्व भागात ९६३ वर्षापूर्वीचे शिलाहारकालीन प्राचीन शिवमंदिर आहे. या प्राचीन वास्तुच्या माध्यमातून अंबरनाथ शहराची ओळख प्रभावीपणे स्थापित करण्याच्या दृष्टीकोनातून मंदिरालगतच्या परिसराचा विकास करण्यात येत आहे. या शहराची कीर्ती त्यामुळे वाढणार आहे. या ऐतिहासिक ठेव्याचे जतन, संवर्धन व्हावे. पुढील पिढ्यांना मंदिराची यथायोग्य महती कळावी. जगभरातील पर्यटकांनी या स्थळाला भेट द्यावी म्हणून राज्य शासनाने शिवमंदिर परिसराचा विकास करण्याचा निर्णय घेऊन निधीही मंजूर केला आहे. सुशोभिकरण आराखडाही तयार आहे. १४० कोटी रूपये खर्चाचा हा प्रस्ताव पुरातत्व विभागाकडून अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई, ठाणे शहरांप्रमाणेच अंबरनाथचे महत्व वाढेल. जगभरातील पर्यटक शहरात येतील. खासदार शिंदे यांच्या संकल्पनेतून अंबरनाथ शहराचा कायापालट होणाऱ्या योजना राबवल्या जात आहेत. त्यात आधुनिक शुटींग रेंज, सुसज्ज नाट्यगृह, क्रीडा संकुल हे प्रकल्प अंतिम टप्प्यात आहेत. गेली पाच वर्षे आयोजित केला जाणारा शिवमंदिर आर्ट फेस्टिव्हलने देशभरातील कलावंत आणि रसिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. आता शिवमंदिराच्या कलासंपन्न वास्तूकलेचा साजेसे शहरातील विविध चौक आणि रस्त्यांचे सुशोभिकरण केले जाणार आहे. त्यामुळे अंबरनाथ शहर टेंपल सिटी म्हणून ओळखली जाईल. त्यासाठी अंबरनाथ नगरपालिकेने निविदा जाहीर केली आहे. प्राचीन शिवमंदिराच्या वास्तूशैलीला साजेसे चौक आणि रस्त्यांचे सुशोभीकरण करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन आणि सल्लागाराची नेमणूक तीन वर्षांसाठी केली जाणार आहे.

# 'रेझिंग डे'निमित्त ठाणे नगर पोलिसांनी दिले विद्यार्थ्यांना कायद्याचे धडे

## आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन



**ठाणे :** महाराष्ट्र पोलीस स्थापना दिन अर्थात रेझिंग डे च्या निमित्ताने ठाणे नगर पोलीस ठाण्याच्या वतीने सोमवारी विद्यार्थ्यांना शस्त्र हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच, पुढील आठवडाभर सायबर गुन्हे, वाहतुकीचे नियम आणि महिला संरक्षण आदी विषयांवर अभ्यासवर्ग-पथनाट्य आदींचे आयोजन करण्यात येणार आहे.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी रेझिंग डेच्या निमित्ताने ठाणे नगर पोलीस ठाण्यास भेट दिली. यावेळी ठाणे नगर पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस ठाण्याच्या आवारात पोलिसांच्या वतीने पिस्तूल, कार्बाईन, एसएलआर, ए के ४७, ३ नॉट ३, टीयर गॅस गन आदी अत्याधुनिक शस्त्रांची माहिती पोलिसांच्या वतीने देण्यात आली. तसेच, स्वसंरक्षणार्थ करावयाच्या उपायोजनांबद्दलही मार्गदर्शन करण्यात आले. या विद्यार्थ्यांना या प्रसंगी पोलीस ठाण्याच्या कामकाजाबद्दल वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराज रणवरे यांनी माहिती दिली.

दरम्यान, रेझिंग डे च्या निमित्ताने ठाणे नगर पोलीस ठाण्याच्या वतीने आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये महिलांचे संरक्षण, सायबर गुन्हे, वाहतुकीचे नियम आदींबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यासाठी ठाणे स्टेशन, बाजारपेठ आदी ठिकाणी पथनाट्यांचेही आयोजन करण्यात येणार आहे, असे सहायक पोलीस आयुक्त सोनाली ढोले यांनी सांगितले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक डी. आर. जाधव, प्रशिक्षक चौधरी, पोलीस हवालदार दिलीप माने, पोलीस नाईक आरीफ तडवी, पो. ना. सानप आदी उपस्थित होते.

# कशेळी गोळीबारात म्होरक्यासह साथीदार जेरबंद

## वागळे इस्टेट गुन्हे युनीटची कामगिरी

## अपमानास्पद वागणूकीतून हत्या केल्याची कबुली



**ठाणे:** मयत गणेश कोकाटे यांच्याकडून २०१४ मध्ये एका गुन्ह्यात अपमानास्पद वागणूक मिळाली होती. त्याचा राग मनात धरून त्यांची गोळ्या घालून हत्या केल्याची कबुली म्होरक्या धनराज उर्फ धन्या तोडणकर (३३) आणि त्याचा साथीदार संदिपकुमार सोमेलाल कनोजिया (२७) यांनी पोलिसांना दिली. तसेच तोडणकर यांच्या श्रीनगर पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल असून त्याला एका गुन्ह्यात न्यायालयाने फरार घोषीत केले आहे. तसेच गुन्ह्यानंतर ते महाराष्ट्राबाहेर पळून गेल्याची माहिती समोर आली आहे. तसेच त्या दोघांचा ताबा नारपोली पोलिसांकडे दिला जाणार आहे. अशी माहिती गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील मंगळवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

कशेळी गावाचे कमानी जवळ ८ डिसेंबर २०२२ रोजी जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने घरी जाताना गणेश कोकाटे यांच्यावर त्या दोघांकडून गोळीबार करण्यात आला होता. यामध्ये कोकाटे यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक पोलीस आणि गुन्हे शाखेमार्फत समांतर तपास सुरू होता. दरम्यान वागळे इस्टेट गुन्हे शाखा युनीटला तपासामध्ये तांत्रिक विश्लेषण मध्ये या गुन्हा हा धनराज उर्फ धन्या तोडणकर व त्याचा एक साथीदार यांनी केला असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार त्यांचा शोध घेत असताना, गुन्हे शाखा, घटक ५ चे सहायक पोलीस निरीक्षक भुषण शिंदे यांना मारेकरी मंगळवारी सकाळी ठाण्यातील इंदिरानगर नाका येथे येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून त्या दोघांना मोठ्या शिताफीने जेरबंद केले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. तोडणकर हा ठाण्यातील इंदिरानगरचा तर संदीपकुमार हा उत्तरप्रदेश, सुलतानपुर येथील रहिवासी आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली.

ही कामगिरी गुन्हे शाखा वागळे घटक - ५, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके, सहायक पोलीस निरीक्षक भुषण शिंदे, सहाय्यक पोलीस निरिक्षक अविनाश महाजन, पोलीस उपनिरिक्षक शिवाजी कानडे, सहायक फौजदार सुनिल अहिरे, पोलीस हवालदार जगदीश न्हावळदे, विजय काटकर, अजय फराटे, संदिप शिंदे, विजय पाटील, माधव वाघचौरे, सुनिल रावते, शशिकांत नागपुरे, रोहिदास रावते, सुनिल निकम, पोलीस नाईक रघुनाथ गार्डे, तेजस ठाणेकर, उत्तम शेळके, पोलीस कॉन्स्टेबल अमोल इंगळे, यश यादव, महिला पोलीस हवालदार मिनाक्षी मोहिते व सुनिता गिते या पथकाने केली आहे.

# समाजकल्याण खात्याने मान्यता दिलेले गटई स्टॉल कायम करा

## गटई चर्मकार समाज कामगार संघटनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**ठाणे:** राज्याच्या विविध जिल्ह्यांमध्ये समाजकल्याण खात्याने गटई स्टॉलसला मान्यता दिली आहे. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांकडून गटई स्टॉलसवर कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई थांबवून गटई स्टॉल्स कायम करावेत, अशी मागणी गटई चर्मकार समाज कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मंत्रालयात भेट घेऊन केली.

बृहन्मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यातील सर्व महानगर पालिका, जिल्हा परिषद परिक्षेत्र तसेच रायगड, नाशिक जिल्ह्यात समाजकल्याण खात्याच्या वतीने चर्मकार बांधवांना चर्माद्योगासाठी गटई स्टॉल उभारण्यास मान्यता दिली आहे. हे स्टॉल उभारण्यासाठी समाजकल्याण खात्याने अनुदानही दिले असून त्या संदर्भातील लेखी आदेशही संबधित जिल्हा प्रशासनाकडून जारी करण्यात आलेले आहेत. तर, अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांनीही आपापल्या सर्वसाधारण सभांमध्ये मंजुर्या घेऊन काही स्टॉल अधिकृत केले आहेत. मात्र, समाज कल्याण खात्याने दिलेले स्टॉल अधिकृत करण्याबाबत कोणत्याही प्रकारची ठोस भूमिका घेतलेली नाही. परिणामी, या स्टॉल्सच्या माध्यमातून आपली उपजिविका करणार्या चर्मकार बांधवांच्या या स्टॉल्सवर संबधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडून अनेकदा कारवाई करण्यात येत असते. तसेच, बृहन्मुंबई मनपा हद्दीमध्ये बैठा व्यवसाय परवाना देण्यात आलेल्या गटई कामगारांकडून भाडे आकारणी करणे बंद करण्यात आलेले आहे. या मागे मूळ मालकाचा मृत्यू झाल्याचे कारण पुढे करण्यात येत आहे. परिणामी, पिच परवानाधारकाचे वारस बेरोजगार होत आहेत. त्यामुळे राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये समाजकल्याण खात्याने मान्यता दिलेले गटई स्टॉल विद्यमान स्थितीत ज्या ठिकाणी आहेत; त्याच ठिकाणी कायम करावेत, बैठा व्यवसाय परवानाधारक मयत झाले असल्यास त्यांच्या वारसाकडून भाडे वसूल करुन परवाना वारसांकडे हस्तांतरीत करण्यात यावेत अशी मागणी त्या निवेदनात केली आहे. या मागण्यांचा सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

# ठाण्यात यूपीएससी पूर्व परीक्षेच्या सराव परीक्षेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ठाणे :** केंद्रीय लोकसेवा आयोग (णझडउ) पूर्वपरीक्षा २८ मे २०२३ रोजी होणार असून या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ठाणे महापालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमार्फत ३ जानेवारी २०२३ रोजी आयोजित केलेल्या सराव परीक्षा सत्राला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संस्थेमार्फत एकूण ३६ सराव परीक्षा सत्र आयोजित केली असून सदर सराव परीक्षेतील प्रत्येक प्रश्नपत्रिकेचे तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून मूल्यांकन केले जाणार आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करणारी चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था चालविणारी देशात ठाणे महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत २८ मे २०२३ रोजी यूपीएससीची पूर्व परीक्षा होणार आहे. पूर्व परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन करुन,महाराष्ट्रातून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचा टक्का वाढविणेकरीता चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमार्फत संस्थेतील २०२२-२३ या प्रवेश वर्गातील विद्यार्थी व ठाणे शहरातील इच्छूक विद्यार्थी यांचेकरीता ०३ जानेवारी ते २५ मे २०२३पर्यंत एकूण ३६ सराव परीक्षा सत्राचे व सदर सराव परीक्षेतील प्रत्येक प्रश्नपत्रिकेचे तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून मूल्यांकन करणेबाबतचा विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे.

# प्रशांत जाधव हल्ल्याचा तपास क्राईम ब्रँचकडे देण्याची भाजपाची मागणी



## आमदार निरंजन डावखरे, संजय केळकर यांचे पोलिस आयुक्तांना निवेदन

**ठाणे :** भाजपाचे पदाधिकारी प्रशांत जाधव यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा तपास क्राईम ब्रँचकडे द्यावा, त्याचबरोबर वागळे इस्टेट पोलिसांच्या पक्षपाती वर्तनाची चौकशी करावी, अशी मागणी भाजपने पोलिस आयुक्त जय जीत सिंग यांच्याकडे केली आहे. भाजपाचे आमदार व जिल्हाध्यक्ष निरंजन डावखरे आणि आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सोमवारी ही आग्रही मागणी केली

कशिश पार्क व परिसरातील अतिक्रमणे व गैरप्रकारांविरोधात प्रशांत जाधव यांनी सातत्याने आवाज उठविला. त्यावरून त्यांना धमक्या देण्यात आल्या होत्या. कशिश पार्क परिसरात काही दिवसांपूर्वी फलक लावण्यावरून त्यांना रोखण्यात आले होते. त्यावेळी वागळे इस्टेट पोलिसांकडे तक्रार करण्यात आली होती. मात्र, त्याची पोलिसांकडून दखल घेण्यात आली नाही. अशा परिस्थितीत जाधव यांच्यावर शुक्रवारी सायंकाळी पूर्वनियोजित कट करून हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात आरोपी म्हणून ठाणे महापालिकेच्या दोन माजी नगरसेवकांसह काही कार्यकर्त्यांचा समावेश आहे. या हल्ल्याचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध आहे. त्यात जाधव यांच्यावर समाजकंटकांनी हल्ला केला असल्याचे स्पष्ट दिसत आहे. धक्कादायक म्हणजे या फुटेजमध्ये एक पोलिस गणवेशात दिसत आहे. त्यामुळे पोलिसांसमोरच हल्ला झाला असल्याकडे निवेदनाद्वारे लक्ष वेधण्यात आले.

या प्रकरणाची वागळे इस्टेट पोलिसांकडून गंभीर दखल घेण्याची आवश्यकता होती. मात्र, हल्ला घडल्यानंतर अनेक तास गुन्हा नोंदविण्यात दिरंगाई झाली. त्यामुळे आरोपी मोकाट फिरत होते. वागळे इस्टेट पोलिसांनी तातडीने उपाययोजना केल्या नाहीत. त्यामुळे पोलिसांकडून पक्षपाती भूमिका घेतली गेली, असा आरोप भाजपाच्या शिष्टमंडळाने निवेदनात केला आहे. या शिष्टमंडळात भाजपाचे प्रदेश सचिव संदीप लेले, माजी गटनेते मनोहर डुंबरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. वागळे इस्टेट पोलिस ठाण्याच्या पोलिस अधिकाऱ्यांकडून हेतुपुरस्सर व जाणूनबूजून कारवाईला दिरंगाई होत आहे. तसेच संबंधित पोलिस अधिकारी दबावाखाली आहेत. त्यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी विनंती निवेदनात करण्यात आली.

# पूर्ण झालेल्या कामांवरच ठाणे महापालिकेकडून कोट्यवधींची उधळपट्टी

**ठाणे :** नवीन गटात गेलेल्या नगरसेवकांवर मेहेरनजर म्हणून एकदा पूर्ण झालेल्या तसेच सुस्थितीत असलेल्या कळवा, मुंब्रा येथील नागरी कामांवर कोट्यवधींची उधळपट्टी ठाणे महानगर पालिकेकडून केली जात असल्याचा प्रकार राष्ट्रवादी काँग्रेसच्या विभागीय महिलाध्यक्षा ऋताताई आव्हाड यांनी उघडकीस आणला आहे. या संदर्भात त्यांनी नुकतेच एक ट्वीट केले आहे.

एकीकडे ठाणे महानगर पालिकेची आर्थिक अवस्था अत्यंत दयनिय असल्याचे वृत्त अनेकदा प्रसारीत करण्यात येत असतानाच ठाणे महानगर पालिकेकडून अनावश्यक कामांसाठी कोट्यवधी रुपयांची उधळण केली जात आहे. या कामांमध्ये, कळव्यातील इंदिरा नगर पादचारीपुल ते रामेश्वर सोसायटी या रस्त्याचे युटीडब्ल्यूटी पद्धतीने काँक्रिटीकरण करण्यासाठी ३ कोटी रुपये; खारीगाव रेल्वेफाटक ते सर्व्हेक्षर बिल्डींग या रस्त्याचे युटीडब्ल्यूटी पद्धतीने काँक्रिटीकरणासाठी ४ कोटी ६० लाख; स्वामी समर्थ मठ ते ओंकार सोसायटी रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी ६.५० कोटी; आरजी २२ ते रघुकूल सोसायटीमधील मंजूर विकास आराखड्यातील रस्त्याच्या डांबरीकरणासाठी २.५० कोटी; केशव हाईट्स ते रिलायन्स पर्यंतच्या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ४ कोटी; मुंब्रा प्रभाग समितीमधील रेतीबंदर स्मशानभूमी रस्ता तयार करण्यासाठी १ कोटी १७ लाख आणि ओएँसीस आर्केड येथील रस्त्यासाठी ५९ लाखांची तजवीज करुन या कामांचे वाटपही करण्यात आलेले आहे. विशेष म्हणजे, आधीच ही सर्व कामे पूर्ण झाली असून हे सर्व रस्ते सुस्थितीमध्ये आहेत. या रस्त्यांच्या कामांची हमीदेखील घेतली जात आहे. असे असतानाही नव्याने स्थापन झालेल्या गटात सहभागी झालेल्या नगरसेवकांसाठी जनतेच्या पैशांची उधळपट्टी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

दरम्यान, केवळ राजकीय हेतू साध्य करण्यासाठी ठाणेकरांच्या करातून मिळालेल्या पैशांची उधळपट्टी केली जात असल्याने सामान्य ठाणेकरांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

# टोव्हींग व्हॅन पुढे रस्त्यावर झोपून अनोखे आंदोलन

## 'पत्राचे उत्तर दया' अशी केली मागणी

**ठाणे :** ठाणे शहरात गेल्या काही महिन्यापासून पुन्हा सुरू झालेल्या वाहतुक पोलीसांच्या टोव्हींग व्हॅनविरोधात ठाण्यात राजकीय पक्षांकडून आंदोलन केले जात असताना, शनिवारी ठाण्यातील एका दक्ष नागरीकाने अनोखे पद्धतीने आंदोलन केले. यावेळी दक्ष नागरिक चक्क व्हॅनच्या पुढे रस्तावर झोपून आंदोलन केले. यावेळी त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराला उत्तर दया असा बॅनर हाती घेत. वाहतुक पोलिसांची मुजोरी बंद झाली पाहिजे, शहरात पी वन पी टू ची सुविधा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी यावेळी केली.




शहरात मागील सुमारे दोन वर्षे टोव्हींग व्हॅन बंद होती. परंतु काही महिन्यापूर्वी वाहतुक पोलिसांकडून पुन्हा ही व्हॅन सुरु करण्यात आली. रस्त्याच्या कडेला, वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या दुचाकी, चारचाकी वाहन चालकांवर या माध्यमातून कारवाई केली जात आहे. मात्र दंडाची रक्कम ही अधिक वाढलेली आहे. त्यामुळे टोव्हींग व्हॅन पध्दत बंद व्हावी या विरोधात पहिल्या दिवसापासून दक्ष नागरिक संग्राम डोंगरे यांच्या माध्यमातून विविध स्वरुपाचे आंदोलन उभे केले गेले आहे. तसेच या विरोधात सह्यांची मोहीम देखील त्यांनी राबविली होती. परंतु अद्याप ही पध्दत बंद करण्यात आलेली नाही. त्यामुळे याविरोधात नाईलाजास्तव हे आंदोलन करावे लागल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

नौपाड्यात दुपारच्या सुमारास दुचाकीवर कारवाई करण्यासाठी आलेल्या टोव्हींग व्हॅनच्या पुढे झोपून त्यांनी हे आंदोलन केले. यावेळी आंदोलनकर्ते बाजूला होत नसल्याने व्हॅन वाहतुक पोलिसांनी मागे घेतली. तरीसुध्दा डोंगरे हे आंदोलनावर ठाम असल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी टोव्हींग पध्दत बंद करण्याची प्रमुख मागणी केली आहे. तसेच पार्कींग धोरणाची अंमलबजावणी करण्यात यावी, रस्त्यावर पी वन, पी टू लागू करावे, रस्त्याच्या कडेला पिवळ्या पट्टे मारावेत आणि पार्कीगची समस्या आधी सोडावी अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली. परंतु एवढे करुनही यावर तोडगा निघत नसेल तर आणखी तीव्र स्वरुपात आंदोलन उभे केले जाईल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, ९ जानेवारी २०२३



# शहरातील प्रवेशद्वार लक्षवेधी असावीत
## आयुक्त अभिजीत बांगर



**ठाणे : ठाणे हे तलावांचे शहर म्हणून ओळखले जाते. शहरात प्रवेश करताना सर्व प्रवेश द्वार ही शहराची ओळख करुन देणारी, प्रतिनिधित्व करणारी असावीत. तलावांचे शहर म्हणजे 'सिटी ऑफ लेक' ही ओळख अधोरेखित व्हावीत अशा पध्दतीने प्रवेश द्वारांची मांडणी असावी अशा सूचना महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी आढावा बैठकीदरम्यान सर्व अधिकाऱ्यांना दिल्या.**

ठाणे शहरात आनंदनगर, खारीगांव, गायमुख, डायघर, भिवंडी, विटावा, पलावा, कशेळी या ठिकाणी ठाण्यात प्रवेश करता येणारी मुख्य ठिकाणे आहेत. या सर्व ठिकाणची प्रवेशद्वार उभारताना ती लक्षवेधी असावीत, ठाणे शहराचे प्रतिनिधीत्व करणारा संदेश असावा. सदरची प्रवेशद्वारे ही शहराची आहेत, त्यामुळे शहरातील लोककला, लोकसंस्कृती, लोकजीवन हे सर्व त्यावर अपेक्षित असून तलावांचे शहर अशी जी ओळख आहे त्याचे प्रतिबिंब त्यावर उमटले पाहिजे त्या दृष्टीकोनातून सर्व प्रवेशद्वारांचे काम करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना बैठकीत आयुक्त बांगर यांनी दिल्या.

'मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे' या अभियानातंर्गत शहरात सौंदर्यीकरण, स्वच्छता, रस्ते आणि शौचालयांची स्वच्छतांची कामे सुरू आहेत. सर्व प्रभाग समितीअंतर्गत सुरू असलेल्या सौंदर्यीकरणाच्या कामांचा आढावा यावेळी घेण्यात आला. बहुतांश प्रभाग समितीतील सौंदर्यीकरणाची कामे ही पुर्णत्वाच्या मार्गावर असून उर्वरित कामांची गती वाढवून सदरची कामे १५ जानेवारीपर्यत पूर्ण करण्याचे निर्देशही बांगर यांनी कार्यकारी अभियंत्यांना दिले.

### स्वच्छतागृहाच्या सफाईचा बदल दृश्यस्वरुपात दिसायला हवा

सर्व प्रभाग समितीमधील सार्वजनिक शौचालयांची पाहणी करुन शौचालयामध्ये छतावरच्या टाकीद्वारे पाणी उपलब्ध असणे हे शौचालय स्वच्छ राहण्यासाठी तसेच नागरिकांच्या सोईसाठी अत्यंत आवश्यक आहे. तरी ज्या शौचालयांवर पाण्याच्या टाक्या नाहीत, अशी शौचालये निश्चित करुन अशा शौचालयावर पाण्याच्या टाक्या बसवून नळाद्वारे पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. ज्या शौचालयांवर इमारतीची क्षमता नसल्यामुळे टाकी बसविणे शक्य नाही अशा शौचालयांवर जमिनीपासून लोखंडी अँगल उभारुन पाण्याच्या टाक्या बसवाव्यात, जर पाण्याचे कनेक्शन देणे शक्य नसेल तर बोअरवेल उपलब्ध करुन देण्यात यावी. सर्व शौचालयात दिव्यांग व्यक्तींना सहज प्रवेश करता येईल अशा पद्धतीने रॅम्प उपलब्ध करुन द्यावेत. ज्या ठिकाणी कडीकोयंडे तुटलेले असतील ते दुरूस्त करुन घ्या. सार्वजनिक शौचालयांसाठी दिशादर्शक फलक अत्यंत महत्वाचे असून त्यांची उपलब्धतता करण्याबरोबरच भिंतींवर सूचनादर्शक फलक असावेत या द्वारे स्वच्छतेबाबत जनजागृती करणे सोईचे होईल.

### स्टॉर्मवॉटर लाईन्सची झाकणे तातडीने बसवावीत

ज्या ठिकाणी पावसाळी गटाराचे चेंबर (स्टॉर्मवॉटर लाईन्स) ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणचे मशीनहोल उघड्या अवस्थेत असतील किंवा झाकणांची दुरावस्था झाली असेल तर तातडीने त्या ठिकाणी झाकणे बसविण्याची कार्यवाही करावी. जर एखादी दुर्घटना घडली तर संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरुन कारवाई केली जाईल असा इशारा देत याबाबत कोणतीही दिरंगाई होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचनाही यावेळी आयुक्त बांगर यांनी दिल्या.

### नागरिकांना प्रतिसाद द्या

ठाणे शहरातील जागरुक नागरिकांनी शहरातील कामासंदर्भात तक्रार केल्यास सदरची समस्या प्राधान्याने सोडवा तसेच त्याचा अभिप्रायही द्या. तसेच जेव्हा लोकप्रतिनिधींकडून आलेल्या तक्रारींना गांभियाने घेवून त्यावर कार्यवाही होणे अपेक्षित असल्याचेही आयुक्तांनी नमूद केले.

# २७ वर्षांनी हक्काची घरे; सफाई कामगारांकडून कृतज्ञता



## आमदार संजय केळकर यांचा हृद्य सत्कार

**ठाणे:** गावदेवी मैदान येथिल तीन इमारती धोकादायक झाल्याने ठाणे महापालिकेकडून तोडण्यात आल्या. त्यामुळे सुमारे २७ वर्षे हक्काच्या घरांपासून वंचित राहिलेल्या सफाई कामगारांना आमदार संजय केळकर यांच्या पाठपुराव्यामुळे मालकी हक्काची घरे मिळाली. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी या कामगारांनी त्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

ठाणे महापालिकेच्या सफाई कामगारांची सुमारे ७२ कुटुंबे गावदेवी मैदान येथील तीन इमारतींमध्ये राहत होती. या इमारती धोकादायक झाल्याने १९९५ साली तोडण्यात आल्या. सफाई कामगारांना १८ महिन्यात मालकी हक्काची घरे देण्याबाबत त्यावेळी लेखी करार करण्यात आला होता. नियोजित वेळेत घरे न मिळाल्याने २००८ साली कामगारांनी उपोषण केले, त्यावेळी महापालिकेने ५० टक्के घरभाडे माफ करून वेळ मारून नेली. त्यानंतर पुन्हा कामगारांनी २०११ साली उपोषण केले. अखेर या कामगारांनी २०१९ साली भगवान बारिया, भीमडा बारिया, रवी राठोड, सनी दाठीया, सोमजी जेठवा आदी कामगारांनी आमदार संजय केळकर यांची भेट घेऊन न्यायाची मागणी केली.

आमदार संजय केळकर यांनी महापालिका आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे या कामगारांची कैफियत मांडून तातडीने घरे उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन ११ जुलै २०२२ रोजी सफाई कामगारांना धर्मवीर नगर येथील सोयी-सुविधांनी युक्त इमारतीमधील घरांच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या.

तब्बल २७ वर्षांनी मालकी हक्काची घरे मिळाल्याने या कामगारांच्या कुटुंबांनी दिवाळी साजरी केली. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १ जानेवारी २०२३ रोजी आमदार संजय केळकर यांचा भव्य सत्कार या कुटुंबांनी करून कृतज्ञता व्यक्त केली. आम्हाला घरे मिळावीत म्हणून आम्ही अनेक नेत्यांच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवले. अखेर आमदार संजय केळकर यांनी आम्हाला हक्काची घरे मिळवून दिली. आम्हीच नाही तर आमच्या पुढील पिढ्याही त्यांच्याबद्दल कृतज्ञता बाळगतील, अशा भावना भगवान बारिया यांनी व्यक्त केल्या.

# महाराष्ट्र ऑलिम्पिक स्पर्धेत ठाण्याला १२ पदके

## ५ सुवर्ण,५ रौप्य आणि २ कांस्यपदके जिंकली

**ठाणे:** पुण्याच्या बालेवाडी येथे ४ आणि ५ जानेवारी पार पडलेल्या महाराष्ट्र ऑलिम्पिक २०२२-२३ या स्पर्धेत ठाणे महापालिका प्रशिक्षण योजनेअंतर्गत सराव करणाऱ्या ठाण्यातील सहा खेळाडूंनी वैयक्तिक कामगिरीसह ५ सुवर्णपदकांसह रौप्य आणि कांस्य अशी १२ पदके जिंकली आहेत. या स्पर्धेत ठाण्याची निधी सिंग ही ४ पदके मिळवणारी ती या स्पर्धेतील एकमेव खेळाडू आहे. यामध्ये ३ सुवर्णपदक आणि १ रौप्यपदकाचा समावेश आहे. यामुळे नवीन वर्षाची सुरुवात पदकमय झाली असेच बोलले जात आहे.

ठाण्याच्या निधी सिंग हिने ४०० मीटर आणि ४०० मीटर अडथळा शर्यतीत नवीन वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करत सुवर्णपदक मिळवले. तर ४ पदके मिळवणारी ती या स्पर्धेतील एकमेव खेळाडू आहे ज्यापैकी ३ सुवर्णपदक आणि १ रौप्य पदक आहे. निधीने या दोन्ही स्पर्धांमध्ये नवा जिल्हा विक्रम केला. तसेच आकांक्षा गावडे हिने २०० मीटरमध्ये वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी केली. निधी सिंग, सानिका नाटे आणि आकांक्षा गावडे यांनी ४ x १०० मीटर रिलेमध्ये सुवर्णपदक मिळवले. निधी सिंग, आकांक्षा गावडे, सानिका नाटे आणि ईशा नेगी यांनी ४ x ४०० मीटर रिलेमध्ये रौप्य पदक मिळवले. तर हर्ष राऊत याने पुरुष ४ x १०० मीटर रिलेमध्ये कांस्यपदक मिळवले. निखिल ढाके याने पुरुष ४ x १०० मीटर रिलेमध्ये कांस्यपदक आणि पुरुष ४ x ४०० मीटर रिलेमध्ये रौप्य पदक मिळवले.

> ***मी ४०० मीटरच्या शर्यतीमध्ये ५५.५९ सेकंद आणि ४०० मीटरच्या अडथळ्यांच्या शर्यतीत ६१.५४ सेकंद अशी वेळ नोंदवली जी माझी वैयक्तिक सर्वोत्तम आहे.***
>
> **– निधी सिंग**

> ***निधी खूप चांगल्या फॉर्ममध्ये आहे. तिने आमच्या योजनेनुसार सर्व शर्यती धावल्या. वैयक्तिक सर्वोत्तम करणे ही यशाची गुरुकिल्ली असते. सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे मी खूप आनंदी आहे.***
>
> **– नीलेश पाटकर, प्रशिक्षक.**